# मविप्रच्या विद्यार्थ्यांकडून दहा हजार नागरिकांना सायबर सुरक्षेचे धडे

## प्रशस्तीपत्र, पदक देऊन विद्यार्थ्यांचा गौरव

नाशिक, दि. २४ (सा.वा.) - मविप्रच्या वाणिज्य, व्यवस्थापन आणि संगणकशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी गेल्या सहा महिन्यांत तब्बल १० हजार नागरिकांना सायबर सुरक्षेबद्दल माहिती देत सायबर साक्षर केले आहे.

सीएमसीएस महाविद्यालयाचा संगणकशास्त्र विभाग व पुणे येथील क्विक व्हिल फाउंडेशन यांनी सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षण हा उपक्रम राबवला. याअंतर्गत सायबर योद्धे म्हणून २० विद्यार्थ्यांनी सहा महिन्यात विविध शाळा, महाविद्यालये, कार्यालये, पोलीस ठाणे, बसस्थानक, मंदिरे, उद्याने, ज्येष्ठ नागरिक संघांना भेटी दिल्या. तेथील विद्यार्थी, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी, ज्येष्ठ नागरिक यांना समाज माध्यमांचा वापर करताना, ऑनलाईन व्यवहार करताना काय काळजी घ्यावी, याची माहिती दिली. अनोळखी लिंकवर जावू नका, अनोळखी व्यक्तींचे फोन, भामट्यांकडून दाखवल्या जाणाऱ्या प्रलोभनांना भुलू नका, याविषयी जागृती करण्यात आली. या कामगिरीबद्दल विद्यार्थ्यांना क्विक व्हिल कंपनीतर्फे प्रशस्तीपत्र व पदक देऊन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मधुकर शेलार यांच्या हस्ते गौरविण्यात आले. त्यांना तेजस सूर्यवंशी, साहिल सोनवणे, प्रथमेश पुजारी, भैरव सोनवणी, अमित मोगल, प्रा. मनिषा सावंत, प्रा. रुपाली वाघ, प्रा. तेजल आहेर, प्रा. शीतल कारे, प्रा. स्वाती तपकिरे यांचे मार्गदर्शन मिळाले. त्यांचे मविप्र सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे यांच्यासह अध्यक्ष, संचालकांनी अभिनंदन केले.